**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०९**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : २३/०३/२०१८

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -९ मंगळवार दि. २७/०३/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**मंगळवार दिनांक- २७/३/२०१८ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७७ | मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ७८ | कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर यांचे पत्रानुसार आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांना सेद्रीय शेतमाल विक्रीकरिता महानगरपालिकेचे गाळे उपलब्ध होणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट . |
| ७९ | अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ८० | अहमदनगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- २०० नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ८१ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस बांधकाम साहित्य पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ८२ | अर्जदार नागरिक श्री. पै. शिवकुमार सुरेश शेळके व इतर यांनी अर्जानुसार प्रभाग समिती क्र.-२ ,वॉर्ड क्रमांक १, बील क्रमांक १०९,१११,४०७,८५२,१०६५,११०० चे सर्व तालिम व मंदिर यांची दि. ३१ मार्च २०१८ अखेर शास्तीसह घरपटटी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ८३ | मा. महापौर शहर विकास निधी सन २०१७-२०१८ अंतर्गत ई- निविदा क्र. १६०३ या निविदेच्या मंजुरीबाबत प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील शिवनेरी चौक ते स्विट कॉर्नर पर्यत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत- १]** विषय क्रमांक- ७७ - मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

**२]** विषय क्रमांक- ७८ ते ८३ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- ७७ मंगळवार दि.२७/०३/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब - मागील सभेचे इतिवृत्त वाचन करा.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- ब-याच सभांचे हे इतिवृत्त आहे.२०१६ पासूनचे आहे.इतके दिवस का राहीले.नगरसचिव सांगा.

मा.नगरसचिव श्री.तडवी :- नगरसचिव विभाग सर्व विषयांची यादी मा.सभापतींकडे सादर करण्यात येते.कोणते विषय सभेमध्ये चर्चे करीता घ्यायचे हा सर्वस्वी अधिकार मा.सभापतींचा आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- पुर्वीच्या सभापतींनी इतिवृत्त मंजूर करावयाचे ठेवले आहेत.

मा.प्र.नगरसचिव श्री.तडवी :- हो त्यांनी इतिवृत्त मंजूरीचा विषय विषय पत्रिकेवर घेतलेला नाही.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- तुम्ही आम्हाला एकदम एवढे विषय इतिवृत्ताचे गठ्ठे अजेंडया सोबत पाठविले आहे.आम्हाला या विषयांची काहीही माहिती नाही.आम्हाला या विषयांचा अभ्यासा करीता वेळ दयावा.व पुढील सभेत हा विषय घेण्यात यावा.

मा.श्री.संजय शेंडगे :- मागील सभेचे इतिवृत्त कायम कारणे हा विषय तहकुब करण्यात यावा व पुढील सभेमध्ये घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मा.सदस्यांच्या मागणी नुसार या विषयांचा अभ्यासा करीता वेळ देण्यात येवून सदरचा विषय तहकुब ठेवण्यात येवून पुढील सभेमध्ये घेण्यात येत आहे.

**ठराव :-** सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मा.स्थायी समिती सभा क्र.- ०७ बुधवार दिनांक १७/१२/२०१६ , सभा क्र. ०८ दिनांक १६/२/२०१७,सभा क्र.०९ दि.१४/०३/२०१७ , सभा क्र.०१ दि.१०/०४/२०१७, सभा क्र. ०२ दि.०३/०६/२०१७ , सभा क्र. ०३ दि.०३/०७/२०१७ ,सभा क्र.०४ दि.२८/०८/२०१७ व सभा क्र.५ दि.२६/९/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त तहकुब ठवण्यात येत आहे.पुढील सभेमध्ये हा विषय चर्चे करीता घेण्यात यावा.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- ७८ मंगळवार दि.२७/०३/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर यांचे पत्रानुसार आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांना सेद्रीय शेतमाल विक्रीकरिता महानगरपालिकेचे गाळे उपलब्ध होणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,प्रकल्प संचालक,कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर या संस्थेस सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील भाजी ओटयाचे भाडे मान्यतबाबत कळविले असता त्यांनी जा.क्र.४२१ दिनांक १६/१०/१७ अन्वये सदयस्थितीत एकुण २५ गाळे घेण्यात येतील व त्यामध्ये प्रथमः आठवडयातुन एक दिवस व नंतर मागणी प्रामणे व शेतमालाच्या उपलब्धतेनुसार आठवडे बाजाराच्या दिवसात वाढ करण्यात येईल.

तसेच सदर संकुल ब-याच दिवसापासुन बंद असल्याने चांगल्याप्रकारी स्वच्छता व सुरक्षितता ठेवणे आवश्यक आहे.तसेच गाळयांची अनामत रक्कम रू.५०००/-व गाळाभाडे प्रती गाळा रू.५००/-प्रमाणे या कार्यालयामार्फत आपणांस अदा करण्यात येतील असे पत्रात नमुद केले आहे.

तरी कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर या संस्थेस सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील प्रथम २५ भाजी ओटे व नंतरच्या मागणीनुसार प्रती भाजी ओटेची अनामत रक्कम रू.५०००/- व प्रती भाजी ओटेचे दरमहा भाडे रू.५००/- प्रमाणे मनपाच्या अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देणे बाबत सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव व निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,मान्यतेस्तव

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालामधील अ प्रमाणे मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा)यांचा अभिप्राय की,मान्य

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर यांचे पत्रानुसार आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांना सेद्रीय शेतमाल विक्रीकरिता महानगरपालिकेचे गाळे उपलब्ध होणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखविण्यात यावा.

सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- एकुण किती भाजी ओटे आहेत.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- एकुण ८५ भाजी ओटे आहेत.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-किती गाळयांची मागणी केली आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- २५ भाजी ओटयांची सध्या त्यांनी मागणी केली आहे.आवश्यकते नुसार मागणी वाढू शकते.

मा.श्री. संजय शेंडगे :- भाजी ओटया करीता किती भाडे आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.भोसले :- प्रत्येक भाजी ओटया कीरता अनामत रक्कम रू.५०००/- व प्रती भाजी ओटेचे दरमहा भाडे रू.५००/- प्रमाणे आहे.ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.बाबासाहेब वाकळे :- कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गटा व्यतीरीक्त येणा-या शेतक-यांनी मागणी केल्या त्यांना भाजी ओटे भाडेतत्वावर देण्यात यावे.

मा. सभापती साहेब :- कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर या संस्थेस सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील २५ भाजी ओटे देण्यात यावेत. तसेच नंतरच्या मागणीनुसार प्रती भाजी ओटेची अनामत रक्कम रू.५०००/- व प्रती भाजी ओटेचे दरमहा भाडे रू.५००/- प्रमाणे मनपाच्या अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यात येत आहे. तसेच शेतकरी त्यांच्या शेतीमधील माल घेवून विक्री करीता आल्यास त्यांना भाजी ओटे देणे बाबत धोरण ठरविण्यात येवून त्यांना सुध्दा भाजी ओटे उपलब्ध करून देणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी

मा.सभापती साहेब :- आजच सभेमध्ये मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून ॲडव्होकेट महेश शरदराव काळे यांचा अर्ज प्राप्त झाला आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- प्रलंबित दावे किती ? एवढे लोकांची गरज आहे का ?

कामगार विभाग श्री. सोनवणे :- दिवाणी ६९६ दावे प्रलंबित १४९ टॅक्स अपील उच्च न्यायालयात ११८ दावे आहेत.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- एवढे दावे जर प्रलंबित असतील तर वकील आवश्यक आहेत.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.तसेच अर्जदार ॲड.महेश शरदराव काळे यांना महानगरपालिकेच्या अहमदनगर येथील काम पहाण्याकरिता अहमदनगर महानगरपालिकेच्या विधीतज्ञ पॅनलवर नियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर या संस्थेस सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील प्रथम २५ भाजी ओटे व नंतरच्या मागणीनुसार प्रती भाजी ओटेची अनामत रक्कम रू.५०००/- व प्रती भाजी ओटेचे दरमहा भाडे रू.५००/- प्रमाणे मनपाच्या अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे. तसेच इतर शेतकरी त्यांच्या शेतीमधील माल विक्री करीता घेवून आल्यास त्यांना भाजी ओटे उपलब्ध करून देणे बाबत धोरण निश्चीती करून या बाबतची कार्यवाही करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर. सभेमध्ये प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या विधीतज्ञ पॅनल मध्ये ॲडव्होकेट महेश शरदराव काळे यांची अहमदनगर महानगरपालिकेच्या विधीतज्ञ पॅनलवर सध्या कार्यरत असलेल्या मानधनावरील इतर विधीज्ञांप्रमाणे मानधनवर नियुक्ती करण्यात यावी.नियुक्ती बाबतचे सर्व कार्यालयीन सोपस्कार संबंधीत विभागाने तात्काळ पुर्ण करावेत.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार कृषीतंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अहमदनगर या संस्थेस सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील प्रथम २५ भाजी ओटे व नंतरच्या मागणीनुसार प्रती भाजी ओटेची अनामत रक्कम रू.५०००/- व प्रती भाजी ओटेचे दरमहा भाडे रू.५००/- प्रमाणे मनपाच्या अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देणे बाबतच्या ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे. तसेच इतर शेतकरी त्यांच्या शेतीमधील माल विक्री करीता घेवून आल्यास त्यांना भाजी ओटे उपलब्ध करून देणे बाबत धोरण निश्चीती करून या बाबतची कार्यवाही करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर. सभेमध्ये प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या विधीतज्ञ पॅनल मध्ये ॲडव्होकेट महेश शरदराव काळे यांची अहमदनगर महानगरपालिकेच्या विधीतज्ञ पॅनलवर सध्या कार्यरत असलेल्या मानधनावरील इतर विधीज्ञांप्रमाणे मानधनवर नियुक्ती करण्यात यावी.नियुक्ती बाबतचे सर्व कार्यालयीन सोपस्कार संबंधीत विभागाने तात्काळ पुर्ण करावेत.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९

विषय क्रमांक- ७९ मंगळवार दि.२७/०३/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :-** पा. पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा योजना ११६३ दि. ०५/०१/१८ चा प्रस्ताव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. शहर पाणी पुरवठा योजना ११६३ दि. ०५/०१/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " पाणी पुरवठा विभागा करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीची कालावधी दि. ०४/०८/२०१७ ते ०३/०२/२०१८ अखेर असुन सदरची मुदत ही दि. ०४ / ०२ / २०१८ रोजी समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबत." सुचित केलेले आहे. संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांची सद्यस्थितीमध्ये जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक २४७१ दि. ०३/१०/२०१७ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी रु. ९,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. ०४/०८/२०१७ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरची मुदत ही दि.०३/०२/२०१८ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांना तंत्रिक खंड देवुन दि. ०७/०२/२०१८ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय असे.

यावर उपयुक्त यांचा अभिप्राय की,मु.ले.अ. मु.ले.प.मार्फत सादर करावे.

यावर मुख्यलेखाअधिक्षक यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावातील "अ" नुसार कार्यवाही करणेस हरकत नसावी.मा.उपायुक्त यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेवूनच मुलेप यांचे स्वाक्षरीसाठी सादर करण्याची यापुढे दक्षता घ्यावी.तसेच आस्था.प्रमुख यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय घेणे योग्य राहील.मागील सेवा कोणत्याही प्रयोजना ग्राहय धरण्यांत येणार नाही.या अधिन राहून विभागाने उचित निर्णय घ्यावा.वरील प्रस्तावाबाबत अधिनियमातील कलम ५३(३) प्रमाणे विभागाने उचित निर्णय घ्यावा.

एकुण पाच मानधनावरील मुदत वाढी बाबत पुढील अभिप्राया नुसार कार्यवाही करावी.

यावर उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मान्य पा.क्र.९८ नंतर पेजींग केले नाही ते करावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

चर्चा :-

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- यांची मुदत केव्हा संपते

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- दिनांक ०३/०२/२०१८ रोजी यांची मुदत संपली आहे.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- मुदत संपल्यावर सुध्द हे लोक काम करीता आहे का?

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :- होय, या कर्म-यांची मुदत संपलेली आहे. तांत्रीक खंड देवून पुर्ननियुक्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये मळु गाडळकर व अमोल मच्छिंद्र शिंदे यांनी अहमदनगर महानगरपालिकेच्या सिटी स.नं.३ लगत अनुक्रमे १०X ५चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर मिळणे बाबत अर्ज देवून मागणी केली आहे.

मा.सौ.उषा नलवडे :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. मळु गाडळकर व अमोल मच्छिंद्र शिंदे यांना स.नं.३ लगत अनुक्रमे १०X०५चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर देण्यात यावी.

मा.सौ. अनिता राठोड :- मळु गाडळकर व अमोल मच्छिंद्र शिंदे यांना स.नं.३ लगत अनुक्रमे १०X०५चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांना तीन दिवसांचा तंत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास पुर्व मंजुरीस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. सभेमध्ये प्राप्त अर्ज व झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीचा विचार करता प्राप्त अर्जानुसार मळु गाडळकर व अमोल मच्छिंद्र शिंदे यांना स.नं.३ लगत अनुक्रमे १०X ०५चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

ठराव :- अ.नगर मनपा पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री व पंपचालक यापदी संदिप प्रभाकर पुंड व इतर ४ यांना तीन दिवसांचा तंत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. सभेमध्ये प्राप्त अर्ज व झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीचा विचार करता प्राप्त अर्जानुसार मळु गाडळकर व अमोल मच्छिंद्र शिंदे यांना स.नं.३ लगत अनुक्रमे १०X ०५चौरस फुट जागा व्यावसाया करीता भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.सौ. अनिता राठोड सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- ८० मंगळवार दि.२७/०३/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- २०० नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर

**संदर्भ :-** ई-निविदा क्र.१५८३.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांचे दि.२१/०८/२०१७ चे मंजुरी अन्वये तसेच मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे सार्व.उद्यान विभागा करिता अहमदनगर महानगरपालिका संपुर्ण हद्दीतील विविध ठिकाणी नागरिकांना बसण्याकरिता -

**आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह**

साईज -

पाठ - ५' लांब x १२" रुंद x ३" जाड

सीट - ५' लांब x १५" रुंद x ३" जाड

स्टँण्ड - २४" लांब x १५" रुंद x ४" जाड

बाकडे हेवी नटबोल्ट फिटींगसह व संपुर्ण बेंचेसला प्रायमर पुटटीसह ऑईलपेंटने रंगवुन उद्यान विभागाच्या सुचनेप्रमाणे प्रत्यक्ष ठिकाणी पोहोच करुन बसवून देणेसह तसेच प्रत्येक बाकडयावर 'अहमदनगर महानगरपालिका मागासवर्ग कल्याण निधी' असे ठळक अक्षरात नाव टाकून देणे.

याप्रमाणे सविस्तर स्पेसिफिकेशनचे - २०० नग खरेदीकामी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांकः भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस **http://amc. maharashtra. etenders.in** या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस तसेच जाहिर टेंडर नोटीस प्रथम वेळ मुदतवाढ प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)राजेंद्र लक्ष्मण लोणकर,अहमदनगर

२)सुनिल रामराव राऊत,अहमदनगर

३)अनिल झेड.कोठारी,अहमदनगर

याप्रमाणे एकूण ३ (तीन) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

आर.सी.सी.सिमेंट बाकडे उपरोक्त नमुद केलेल्या सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे रक्कम रु.५,०००/- १ नग हा दर सुनिल रामराव राऊत,अ.नगर यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम निविदा दर धारक सुनिल रामराव राऊत,अ.नगर यांना दर वाटाघाटी करिता बोलावून दि.३०/११/२०१७ रोजी झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समितीच्या बैठकीत सदरच्या तुलनात्मक तक्त्यासह संपुर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव ठेवण्यात आले असता बैठकीत समक्ष झालेल्या चर्चेनुसार सुनिल रामराव राऊत,अ.नगर यांनी निविदेमध्ये दिलेल्या रक्कम रुपये.५,०००=००प्रती १ नग या दरामश्ये रक्कम रुपये.१५०=०० / प्रती १ नग याप्रमाणे दर कमी करुन रक्कम रुपये.४,८५०=०० / प्रती १ नग यादराने आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह उपरोक्त नमुद सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे - २०० नग पुरवठा करण्याचे मान्य करुन तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.निविदाकार यांनी निविदा दर वाटाघाटी नंतर

दिलेल्या रक्कम रुपये.४,८५०/- प्रती १ नग दरास व सदर दराने उपरोक्त नमुद सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह - २०० नग खरेदी करणेस व त्याकामीयेणा-या रक्कम रुपये.९,७०,०००=०० फक्तच्या खर्चास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकीय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

तरी मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे सुनिल रामराव राऊत, अ.नगर यांनी दर वाटाघाटी नंतर दिलेल्या रक्कम रुपये.४,८५०=०० / प्रती १ नग या दराने आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह उपरोक्त नमुद स्पेसिफिकेशन प्रमाणे-२०० नग खरेदीस त्याकामी येणा-या रक्कम रु.९,७०,०००/-मात्र (अक्षरी रक्कम रु. नऊ लक्ष सत्तर हजार फक्त)खर्चास मा.आयुक्त यांनी दि.११/१२/२०१७रोजी मंजूरी दिलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना जा.क्र.स्टोअर विभाग - ३१६ दि.१४/१२/२०१७ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.१५/१२/२०१७ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन संविदा पूर्ण केलेली आहे तसेच (डिलेव्हरी चलन)पोहोच वर माल ताब्यात मिळाल्याबाबत मा.उप शहरअभियंता,उद्यान अधीक्षक यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

सदर बाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक मनपा अधि. १९४९ चे कलम ७३ (ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.१६/०१/२०१८ चे प्रस्तावावर -
मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "वरील 'अ' प्रमाणे कार्यवाही करावी"
मा.उपायुक्त(कर)यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.
मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त अहवाला मधिल "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीकडे मान्यतेस्तव सादर करणेस हरकत नाही" असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.
मा.आयुक्तसाहेब यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

तरी ई-निविदा क्र.१५८३-अहमदनगर महानगरपालिका सार्व.उद्यान विभागा करिता आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह -२००नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९चे कलम७३ (ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर घनकचरा विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्र.स्टोअर विभाग प्रमुख व घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांच्या प्रस्तावानुसार "अ" प्रमाणे करणे बाबत उचित निर्णयास्तव.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालामधील "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावरमा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

सभापती साहेब :- सार्व.उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- २०० नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री बाबासाहेब वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.संजय शेंडगे :- संविदेची माहिती निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.अनिता राठोड :- संविदेची माहिती निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.संजय शेंडगे :- मा.स्थायी समिती सभा क्र.०७ विषय क्रमांक ७१ दिनांक ०६/०२/२०१८ अहमदनगर महानगरपालिकेचे प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक पदी मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मिळणे बाबतच्या विषय होता.या विषया मध्ये श्री.मयुर शिवकुमार बोचुघोळ,रा.चौपाटी कारंजा,कुंभार गल्ली ,नालेगांव ,अ.नगर यांचे अर्जानुसार क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस सांगळे गल्ली येथील समर्थ विद्या मंदिर शाळेसमोरील व्यायामशाळा भाडेत्वार देणेबाबत मा.स्थायी समितीने ठराव पारित केला आहे. श्री.संतोष चंद्रकांत शिंदे व या भागातील ५५ नागरीकांनी सहया करून तक्रार अर्ज केला असुन सांगळे गल्ली येथील व्यायाम शाळा क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट)यांना भाडेतत्वावर देण्यात येवू नये अशी मागणी केली आहे.त्यानुसार सदर ठरावातील क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस सांगळे गल्ली येथील समर्थ विद्या मंदिर शाळेसमोरील व्यायामशाळा भाडेत्वावर देण्याचा ठराव आज ठराव करून रद्द करण्यात यावा व फक्त प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक पदी मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मिळणे बाबत चा ठराव आमलात ठेवावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सार्व . उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह- २०० नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.स्थायी समिती सभा क्र.०७ विषय क्रमांक ७१ दिनांक ०६/०२/२०१८ मधील मा.स्थायी समितीने पारित केलेला क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस सांगळे गल्ली येथील समर्थ विद्या मंदिर शाळेसमोरील व्यायामशाळा भाडेत्वार देणेबाबत चा ठराव रद्द करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.उदयान विभागाकरिता आर.सी.सी. सिमेंट बाकडे पाठीसह-२०० नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम७३(ड)अन्वये संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मा.स्थायी समिती सभा क्र.०७ विषय क्रमांक ७१ दिनांक ०६/०२/२०१८ मधील क्रां.चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान (ट्रस्ट) या संस्थेस सांगळे गल्ली येथील समर्थ विद्या मंदिर शाळेसमोरील व्यायामशाळा भाडेत्वार देणेबाबत चा ठराव रद्द करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.अनिता राठोड सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९**

विषय क्रमांक- ८१ मंगळवार दि.२७/०३/२०१८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस बांधकाम साहित्य पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,सन.२०१७-२०१८ या आर्थीक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे बांधकाम साहित्य उदा.खडी,राळा,डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल पॅचिंगसाठी,सिमेंट,चाळलेली वाळू,पोयटा माती,हार्ड मुरुम,सॉफ्ट मुरुम,तांबडया विटा,मातीच्या कुंडया,डबर,लालमाती,प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब,सिमेंट मेनहोल कव्हर्स फ्रेमसह,सिमेंट मोझॅक बेंचेस पाठीसह,सिमेंट आर.सी.सी.बेंच पाठीसह व सिमेंट कॉंक्रीट पोल इ.पुरवठा करणेकामी मा.महाराष्ट्र शासन उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक.१ डिसेंबर २०१६ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.४.१ अन्वये ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस **http://amc. maharashtra. etenders.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)अभिषेक प्रोडक्टस्,अहमदनगर

२)नगर इंडस्ट्रिज,अहमदनगर

३)तृष्णा सेल्स् कॉर्पोरेशन,अहमदनगर

याप्रमाणे एकूण तीन (३) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

प्राप्त निविदेतील अ.क्र.-१ ते ३१ चे दर तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले आहेत.अ.क्र.-१ ते ३१ चे साहित्याचे सन.२०१७-१८चे मंजुर DSR दर नमुद करणेसाठी निविदा दराचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.स्टोअर विभाग -१२५ दि.०३/११/२०१७ अन्वये मा.शहर अभियंता - अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस पाठविला असता त्यांनी निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.९मध्ये सन२०१७-१८चे सा.बां. विभागाकडील मंजूर दरसुचीतील उपलब्ध दर नमुद करुन सदरचा तुलनात्मक तक्ता स्टोअर विभागाकडे पाठविलेला आहे.

सदर निविदा अवलोकनार्थ तथा दर वाटाघाटीबाबत निर्णयास्तव दि.३०/११/२०१७, दि.२८/१२/२०१७ व दि.११/०१/२०१८ रोजी मा.प्रशासकिय खरेदी समितीची बैठका घेण्यात आल्या दि.११/०१/२०१८ रोजी प्राप्त ई-निवेदेतील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर धारक पुरवठादार तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांना दर वाटाघाटी करिता मा.प्रशासकिय खरेदी समिती बैठकीत उपस्थित राहणेबाबत कळवून निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपूर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव मा.प्रशासकिय खरेदी समिती समोर निर्णयास्तव सादर करण्यात आले असता -

निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता -

**१)**अ.क्र.- १२,१६,१८ ते ३१ चे DSR दर उपलब्ध नाहीत

**२)**अ.क्र.- ३ ते ८,१० ते ११,१३ ते १५ व १७ चे निविदा दर DSR दरापेक्षा कमी आहेत.

**३)**अ.क्र.- १,२ व ९ चे निविदा दर DSR दरापेक्षा जास्त आहेत.

तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी मा.प्रशासकिय खरेदी समितीमध्ये दर वाटाघाटीबाबत समक्ष चर्चा करुन

**१)**ज्या वस्तुंचे दर DSR दरापेक्षा जास्त आहेत ते DSR दराप्रमाणे,

**२)**ज्या वस्तुंचे दर DSR दरापेक्षा कमी आहेत ते निविदेमध्ये दिलेल्या दराप्रमाणे,

**३)**ज्या वस्तुंचे DSR दर उपलब्ध नाहीत त्या वस्तुंचे दरामध्ये ३% दर कमी करुन येणा-या दराप्रमाणे पुरवठा करण्याचे मान्य केलेले आहे.तसेच निविदेमधील अ.क्र.३० - आर.सी.सी.सिमेंट बाकडे पाठीसह रक्कम रुपये.४,८५०=०० / प्रती १ नग यादराप्रमाणे पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविलेली असून सदरच्या साहित्य वगळून उर्वरित साहित्याचे निविदा दर मंजूर करणेबाबत लेखी संमतीपत्र दिलेले असून त्यांनी दर वाटाघाटी नंतर कमी करुन दिलेल्या खालील तक्त्यात कॉलम क्र.४ मध्ये नमुद दरास मंजुरी देणेबाबत तसेच सदर प्रस्तावातील अ.नं.१ ते २९,३१ चे साहित्याचे रॉयल्टी,GST दराबाबत मा.शहर अभियंता,मा.मुख्य लेखाधिकारी,मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे स्वतंत्र रीत्या अभिप्राय घेवून प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर

निर्णयास्तव सादर करणेबाबत मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत शिफारस करण्यात आलेली आहे.तसेच निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.३० चे दरात निविदाकार यांनी दर कमी न केल्यामुळे सदरचा दर नामंजूर करण्यात यावा.

